**सामनेवालातर्फे साक्षीदार क्र.१ यांचा सरतपास वकील श्री. आर. ए. औताडे यांचेतर्फे शपथेवर पुन्हा सुरु :-**

**१९.** मी सदर प्रकरणात माझ्या साक्षीचे शपथपत्र दाखल केले आहे. त्यावर माझी सही आहे, त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे.

**सरतपास पुर्ण.**

**साक्षीदाराचा उलटतपास अर्जदारा करिता वकील श्री. एस. व्ही. कुलकर्णी यांच्यातर्फे-**

**२०.** अर्जदार हिच्या वडीलांना लग्न लावून देण्याकरिता रोख रक्कम रुपये एक लाख दिले होते हे दाखविण्याकरिता मी अभिलेखावर कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, माझ्या आई व अपंग बहिण यांना दवाखान्यात आणणे नेणे करण्याकरिता मी चारचाकी वाहन घेतलेले आहे. मी माझ्या आईला व अपंग बहिणीला महिन्यात किती वेळा उपचाराकरिता चारचाकी वाहनाने दवाखान्यात आणणे नेणे करतो याबाबत मी काहीही उल्लेख माझ्या लेखी जबाबामध्ये केलेला नाही तसेच सदर बाब दाखविण्याकरिता मी सदर प्रकरणात कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. माझ्या आई व अपंग बहिणीच्या उपचाराकरिता मला दरमहा किती खर्च लागतो हे दाखविण्याकरिता मी सदर प्रकरणात कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

**२१.** मी महिंद्रा फायनान्स कंपनीकडून कर्ज घेवून चारचाकी वाहन खरेदी केलेले आहे. माझी एक बहिण मुंबई येथे पोलिस विभागात नोकरीला आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार हिच्यासोबत मुंबई येथे बहिणीकडे गेलो असता त्याठिकाणी अर्जदार हिच्यासोबत भांडण करुन तिला बेदम मारहाण केली होती. हे म्हणणे खरे नाही की, त्यावेळेस माझी बहिण हिने सुध्दा अर्जदार हिला दमदाटी व शिवीगाळ केली होती. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे असलेल्या स्वीफट डिझायर या गाडीवर मी भाडोत्री चालक कामाला ठेवलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या मालकीच्या स्वीफट डिझायर गाडीने प्रवासी वाहतुक करीत असल्याच्या कारणावरुन बरेच वेळा दंड आकारण्यात आलेला आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्याकडे दोन दुचाकी वाहन आहेत.

**२२.** हे मला माहिती नाही की, शिर्डी येथे धर्मादाय दवाखाना असून त्याठिकाणी पेशंटचे मोफत उपचार केले जाते किंवा नाही. मी माझ्या आईला उपचाराकरिता शिर्डी

येथील दवाखान्यात कधीही नेले नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी माझ्या मालमत्ता आणि जबाबदा–या शपथपत्रामधील कुटूंबातील सदस्याला गंभीर अपंगत्व असल्यास त्यांना पुरविण्यात येणारा खर्च लागु नाही असे नमुद केले ते मी खोटे नमुद केले आहे. शिर्डी येथे माझ्या मालकीचे स्वतःचे पक्के घर आहे. साक्षीदार नंतर सांगतो की, आईच्या नावाने घर आहे.

**२३.** अर्जदार ही दवाखान्यात लॅब असिस्टंट म्हणुन काम करते व त्यापासुन तिला दरमहा रक्कम रुपये वीस हजार उत्पन्न मिळते हे दाखविण्याकरिता मी सदर प्रकरणात कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही. अर्जदार ही ब्युटी पार्लर चालविते, मेहंदी काम करते, शिलाई काम करते व त्यापासुन तिला दरमहा रक्कम रुपये दहा ते पंधरा हजार उत्पन्न मिळते हे दाखविण्याकरिता मी सदर प्रकरणात कोणताही कागदोपत्री पुरावा दाखल केलेला नाही.

**२४.** हे म्हणणे खरे नाही की, मी नोटीसमध्ये हे खोटे नमुद केले आहे की, अर्जदार मला आई वडीलांसोबत बोलण्यास निर्बंध लावण्यात आले होते. हे म्हणणे खरे नाही की, मी अर्जदार हिला प्रामाणिकपणे कधीही नांदावयास नेण्यास प्रयत्न केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी सदर प्रकरणात माझे साक्षीचे खोटे शपथपत्र दाखल केले आहे. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला पत्नी म्हणुन तिला वागवायची तयारी नाही. अर्जदार ही तिच्या माहेरी राहत आहे तेव्हापासुन मी तिच्या उदरनिर्वाहाकरिता आजपर्यंत कोणतीही तरतुद केलेली नाही. हे म्हणणे खरे नाही की, अर्जदार हिला नांदावयास नेण्याकरिता मी तिच्या वडीलांना बोललो नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी आजरोजी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास संपला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

JITENDRA DUDHRAM JADHAO

Digitally signed by JITENDRA DUDHRAM JADHAO
Date: 2026.02.16 15:40:23 +0530

**(जितेंद्र दु. जाधव)**

न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.१, श्रीरामपुर.

ठिकाण : श्रीरामपुर.

दिनांक : १६/०२/२०२६.